महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ९८७ /२०२३ दि. २४/११/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** अंबरनाथ वाहतूक उप विभागाचे हद्दीत महाराष्ट्र विदयुत वितरण कंपनी कडून कल्याण बदलापूर राज्यमार्गलगत महात्मा गांधी विदयालय प्रांगणात तसेच संरक्षण भिंतीचे कडेला महावितरण कंपनी यांचे साधारणतः ३५ ते ४० वर्षे जुने २५ मीटर मनोऱ्यावर डमी अति उच्चदाब वाहिनी अस्तित्वात आहे. प्रत्यक्षात सदर वाहिनीकडून विदयुत पुरवठा होत नाही. सदर वाहिनी फार जुनी असल्याने ती पूर्णपणे गंजलेली आहे. त्यामुळे भविष्यात अपघात होण्याची शक्यता आहे. तसेच सदर वाहिनीजवळ मध्य रेल्वे यांची ठाकुर्ली ते लोणावळा अति उच्चदाब वाहिनी या वाहिनीखालून जाते.

वरील परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेवून मध्य रेल्वे व महावितरणद्वारे महात्मा गांधी विदयालय यांच्या सहकार्याने सदर जुनी वाहिनी मनोरेसह काढण्याचे काम दि. २४/११/२०२३ रोजी निश्चित करण्यात आलेले आहे. सदर कामाचे स्थळअंतर्गत कल्याण बदलापूर राज्य महामार्ग येतो आणि सदर राज्य महामार्गावरील रहदारी सदर कामकाजाचे वेळी बंद ठेवण्याची अथवा अन्य मार्गाने वळविण्याची आवश्यकता आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे **अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब)** अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) बदलापूर पश्चिम शहराकडून फॉरेस्ट नाका मार्गे कल्याण कडे जाणाऱ्या जड, अवजड वाहनांना **फॉरेस्ट नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने वैभव हॉटेल कडून गोविंदतीर्थ पूल मार्गाने हुतात्मा चौक कडून मटका चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) उल्हासनगर कडून मटका चौक मार्गे बदलापूर कडे जाणाऱ्या जड, अवजड वाहनांना **मटका चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने मटका चौक, हुतात्मा चौक मार्गे गोविंदतीर्थ पूल, वैभव हॉटेल मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसुचना दि. २४/११/२०२३ रोजी सकाळी १०:०० वा. ते १८:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
**पोलीस उप आयुक्त,**
**वाहतूक विभाग, ठाणे शहर.**

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ.

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :—**
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उपायुक्त, परिमंडळ—४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

**<u>प्रत</u>** :— <u>पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर</u>
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u>** :— <u>समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे</u>
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत</u>** :— <u>सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग/प्रभारी अधिकारी, उल्हासनगर, विठठलवाडी, अंबरनाथ वाहतूक शाखा.</u>